# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः 15.06.2024** **वारःशनिवार**

1. विकसनशील देशांच्या समस्यांबाबतच्या मुद्द्यांना प्राधान्य देण्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं जी-सात देशांच्या शिखर परिषदेत आवाहन
2. मोदी यांची फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन, ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांच्यासह विविध राष्ट्रप्रमुखांबरोबर चर्चा
3. कुवेतमध्ये आगीत मृत्युमुखी पडलेल्या 45 भारतीयांचं पार्थिव हवाईदलाच्या विशेष विमानातून भारतात
4. अठराव्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला आजपासून सुरूवात
5. इटलीत पेरुगिया इथं सुरू असलेल्या एटीपी चॅलेंजर स्पर्धेच्या पुरुष एकेरीत भारतीय टेनिसपटू सुमित नागलचा उपांत्य फेरीत प्रवेश आणि
6. टे-ट्वेंटी विश्वकरंडक स्पर्धेत अमेरिका संघ कारकिर्दीच्या इतिहासात पहिल्यांदाच सुपर आठ फेरीत दाखल

**<u>जी-7</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसनशील देशांबाबतच्या, विशेषतः आफ्रिकेच्या मुद्द्यांना प्राधान्य देण्याचं काल आवाहन केलं. इटलीतील अपुलिया इथं जी-सात देशांच्या शिखर परिषदेत एका सत्रात ते बोलत होते. भारत जी-वीस संघटनेचा अध्यक्ष असताना आफ्रिका संघाचा जी-वीसमध्ये कायमस्वरूपी सदस्य म्हणून समावेश होणं हा भारताचा गौरव आहे, असं ते म्हणाले. भारत ऊर्जेची उपलब्धता, आवश्यकता, खर्चाची क्षमता यांच्यानुसार ऊर्जेच्या वापरात करत असलेल्या बदलांबाबत पंतप्रधानांनी माहिती दिली. भारत 2070 पर्यंत कार्बन उत्सर्जन शून्यावर आणण्यासाठी काम करत असल्याचं त्यांनी सांगितलं. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त एक पेड मांक के नाम या मोहिमेत सर्व देशांनी सामील व्हावं आणि या मोहिमेला चळवळीचं स्वरूप द्यावं असं आवाहनही त्यांनी केलं. एआय फॉर ऑल या योजनेबाबत सांगताना ते म्हणाले, की कृत्रिम बुद्धिमत्तेचं तंत्रज्ञान सर्वांच्या कल्याणासाठी आणि प्रगती साधण्यासाठी असायला पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरासाठी भारत आंतरराष्ट्रीय भागिदारीला प्रोत्साहन देत आहे, असंही ते त्यांनी सांगितलं. मानवी इतिहासातल्या सर्वांत मोठ्या लोकशाही प्रक्रियेद्वारे पंतप्रधानपदी फेरनिवड झाल्यानंतर या परिषदेला उपस्थित राहणं ही गोष्ट समाधानाची आहे, असं प्रतिपादन त्यांनी केलं. कोणतंही तंत्रज्ञान यशस्वी होण्यासाठी मानवकेंद्री दृष्टिकोन असला पाहिजे, असं मत व्यक्त करून त्यांनी भारतात सार्वजनिक सेवांच्या पुरवठ्यासाठी भारतानं डिजिटल तंत्रज्ञानाच्या केलेल्या यशस्वी वापराचे दाखले दिले. पाश्चिमात्य देश इतरांविरुद्ध काम करत असल्याचा प्रचार इटली कधीही स्वीकारणार नाही, असं इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी त्यांच्या भाषणात स्पष्ट केलं. सगळ्या देशांनी इतर देशांना आदरासह सहकार्य केलं आणि बरोबर काम केलं तरच जागतिक आव्हानांवर आपण मात करू शकू, असं मत त्यांनी व्यक्त केलं.

**<u>पंतप्रधान-इतर नेत्यांच्या भेटी</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जी-सात शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर अनेक नेत्यांशी द्विपक्षीय चर्चा केली. पंतप्रधानांनी काल दुपारी फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांची भेट घेतली. संरक्षण, आण्विक, अवकाश, शिक्षण,

हवामानविषयक तंत्रज्ञान, डिजिटल पायाभूत सुविधा, संस्कृती या क्षेत्रांमध्ये भागिदारी वाढवण्यासाठी काय करता येईल, याबाबत त्यांनी चर्चा केली. मेक इन इंडिया मोहिमेला बळ देण्यासाठी धोरणात्मक संरक्षण भागिदारी वाढवण्यावर त्यांचं एकमत झालं. फ्रान्समध्ये पुढील वर्षी होऊ घातलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर हे तंत्रज्ञान, तसंच इतर उदयोन्मुख तंत्रज्ञानांमधील भागिदारी वाढवण्याबात दोन्ही नेत्यांचं एकमत झालं. पंतप्रधान मोदी यांनी ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांचीही भेट घेतली. राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळात भारत-ब्रिटन यांच्यातली धोरणात्मक भागिदारीला अधिक बळ देण्यास कटिबद्ध असल्याचं त्यांनी समाजमाध्यमांवरच्या एका संदेशात म्हटलं आहे. उभय देशांमध्ये सेमीकंडक्टर्स, तंत्रज्ञान आणि व्यापार या क्षेत्रांमध्ये परस्परसहकार्य वाढवण्याला संधी असल्याचं मत त्यांनी व्यक्त केलं. संरक्षण क्षेत्रातलं सहकार्य वाढवण्यावर उभय नेत्यांनी चर्चा केली. मोदी यांनी युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्क्री यांच्याबरोबरही बैठक घेतली. युक्रेनमधल्या स्थितीच्या पार्श्वभूमीवर द्विपक्षीय संबंधांचा त्यांनी आढावा घेतला. संवाद आणि राजनैतिक संवाद यांच्या माध्यमातूनच संघर्षांमधून शांततामय मार्ग काढण्याला भारत प्रोत्साहन देत राहील असं पंतप्रधान मोदी यांनी स्पष्ट केलं. इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी, जपानचे पंतप्रधान फुमिओ किशिदा यांच्याबरोबरच संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँतोनिओ गुटेरस यांचीही मोदी यांनी भेट घेतली. दरम्यान, पंतप्रधान ही परिषद संपवून भारताकडे आज सकाळी रवाना झाले आहेत. भावी पिढीसाठी चांगलं जग तयार करण्यासाठी परिषदेत चांगली चर्चा झाली, असं मोदी यांनी समाजमाध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<u>कुवेत-आग</u>**

कुवेतमध्ये आगीत मृत्युमुखी पडलेल्या 45 भारतीयांचं पार्थिव काल हवाईदलाच्या विशेष विमानानं भारतात आणण्यात आले. हे विमान पहिल्यांदा कोचीमध्ये आणि नंतर नवी दिल्लीमध्ये उतरवण्यात आलं. कुवेतमध्ये लागलेल्या या आगीत इमारतीतल्या 176 भारतीय कामगार राहत होते. त्यातल्या 45 कामगारांचा मृत्यू झाला असून, 33 जण भाजल्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. जखमींना योग्य मदत मिळण्यासाठी आणि त्यांना परत भारतात आण्यासाठी कुवेत सरकारच्या सातत्यानं संपर्कात असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<u>यूजीसी</u>**

या वर्षी उच्चशिक्षण संस्थांमधील प्रवेश तीस सप्टेंबरपर्यंत रद्द केल्यास किंवा हस्तांतरित केल्यास त्या संस्थांना पूर्ण शुल्क परत द्यावं लागणार आहे. विद्यापीठ अनुदान मंडळ म्हणजे यूजीसीनं 2024-25 या वर्षासाठी शुल्क परतावा धोरण जाहीर केलं आहे. त्यात पूर्ण परताव्याची तरतूद नमूद करण्यात आली आहे. प्रवेश रद्द केल्यास किंवा ते मागं घेतल्यास शुल्क परत मिळत नसल्याच्या तक्रारी विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी केल्याच्या पार्श्वभूमीवर यूजीसीनं हे धोरण जाहीर केलं आहे. केंद्रीय किंवा राज्य सरकारांच्या अखत्यारीतल्या उच्चशिक्षणसंस्था, यूजीसीनं मान्यता दिलेल्या संस्था, डीम्ड युनिव्हर्सिटीज म्हणजे मानीव विद्यापीठं या सगळ्यांना हे धोरण लागू होणार असल्याचं स्पष्ट करण्यात आलं आहे. तीस सप्टेंबरनंतर आणि 31 ऑक्टोबरच्या आत प्रक्रिया शुल्क म्हणून एक हजार रुपयांपेक्षा कमी रक्कम आकारून परतावा देता येईल, तर 31 ऑक्टोबरनंतर परताव्यासाठी यूजीसीच्या ऑक्टोबर 2018 चा आदेश लागू होईल, असं यूजीसीनं स्पष्ट केलं आहे. यूजीसीच्या धोरणं धुडकावल्यास कडक कारवाईचा इशारा 2018 च्या आदेशात देण्यात आला आहे.

**<u>मिफ</u>**

18 व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला आजपासून मुंबईतल्या फिल्म्स डिव्हिजनच्या परिसरात सुरूवात होत आहे. महोत्सवातले चित्रपट यंदा पहिल्यांदाच मुंबईसह पुणे, दिल्ली, कोलकाता आणि चेन्नईमध्ये दाखवले जाणार आहे. मिफ हा दक्षिण आशियातला लघुपट, माहितीपट आणि ॲनिमेशनपटांसाठीचा सर्वांत जुना आणि मोठा

चित्रपट महोत्सव आहे. मिफ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामुळं देशातल्या कलाकारांना जागतिक व्यासपीठ मिळेल, असं प्रतिपादन माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी केलं. महोत्सवाच्या पूर्वसंध्येला आयोजित पत्रकार परिषदेत ते काल मुंबईत बोलत होते. यंदाच्या मिफ मध्ये 59 देशांतील 61 भाषांमधील 314 चित्रपट, तसंच आंतरराष्ट्रीय स्पर्धा श्रेणीत 25 आणि राष्ट्रीय स्पर्धा श्रेणीत 77 चित्रपट प्रदर्शित होणार आहेत. साठ देश त्यांच्या चित्रपटांद्वारे आणि इतर प्रकारच्या कार्यक्रमांतून महोत्सवात सहभागी होत असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

कोळसा लिलाव

व्यावसायिक वापरासाठीच्या कोळसा खाणींसाठी दहावी लिलाव फेरी लवकरच होणार आहे. या फेरीत 62 खाणींचा लिलाव होणार आहे. पुढच्या आठवड्यात ही फेरी सुरू होईल, अशी घोषणा केंद्रीय कोळसा आणि खाणकाम मंत्री जी. किशन रेड्डी यांनी केली आहे. यापूर्वीच्या नऊ फेऱ्यांमध्ये 107 खाणींचा लिलाव यशस्वीरित्या पार पडला आहे.

टेनिस-सुमित नागल

भारतीय टेनिसपटू सुमित नागलने इटलीतल्या पेरुगिया इथं सुरू असलेल्या एटीपी चॅलेंजर स्पर्धेच्या पुरुष एकेरीत उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. काल झालेल्या उपांत्यपूर्व फेरीत सुमितनं पोलंडच्या मॅक्स कास्निकोव्स्कीचा 6-4, 7-5 असा पराभव केला. सहाव्या मानांकित सुमित नागलनं उत्कृष्ठ खेळी करत 10 दिवसांत सलग आठवा सामना जिंकला आहे . आज उपांत्य फेरीत त्याची लढत स्पेनच्या बर्नाबे जपाता मिरालेसशी होणार आहे. फ्रेंच ओपन आणि हेल्ब्रॉन चॅलेंजरमधल्या सुरेख कामगिरीनंतर नागलनं जागतिक क्रमवारीत 77व्या स्थानावर झेप घेतली आहे. त्याच्या एकेरीच्या क्रमवारीच्या आधारे तो पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्र ठरला आहे.

T20 विश्वकरंडक

आईसीसी पुरुष टी-20 विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत लॉडरहिलमध्ये झालेल्या कालच्या सामन्याच्या वेळी पावसाचा व्यत्यय आल्यामुळे अमेरिका आणि आयर्लंड यांच्यातला महत्वाचा सामना रद्द झाला. त्यामुळे अमेरिका संघांनं आपल्या कारकिर्दीच्या इतिहासात पहिल्यांदाच सुपर आठ फेरीत प्रवेश केला आहे. भारतानंतर अ गटातून पुढच्या फेरीत प्रवेश करणारा अमेरिका हा दुसरा संघ ठरला आहे. पूर्व विजेता पाकिस्तान संघ आणि आयर्लंड हे सुपर आठ स्पर्धेतून बाहेर पडले आहेत. आज, भारताचा शेवटचा गट सामना कॅनडाशी होणार असून, भारतीय प्रमाण वेळेनुसार फ्लोरिडा मधल्या सेंट्रल ब्रॉवर्ड पार्क मैदानावर रात्री 8 वाजता सामना सुरू होईल.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार